# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## अंतर्गत - संज्ञापन पत्र

**प्रेषक :** प्रा. विजयकुमार पाईकराव — **विषय:** DEBअंतर्गत Minor Research Project

**प्रति:** मा. कुलगुरु — **दिनांक:** १६/०१/२०१५

कृपया नियोजन अधिकारी यचममुवि ह्यांचे अंतर्गत संज्ञापन पत्र दि. ०५/०१/२०१५ अन्वये DEB अंतर्गत Minor Research Project साठी खालिल विषयावर संशोधन प्रकल्पासाठी प्रस्ताव पाठवत आहोत. सविस्तर प्रस्ताव सोबत जोडला आहे.

- **संशोधन शीर्षक :-**

  "शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अभ्यासकेंद्रांच्या समस्यांचा शोध घेऊन व्यवहार्य कार्यानंदासाठी आचारसंहितेची पुस्तिका विकसित करणे.

**अपेक्षित खर्च :-**

| | | |
|---|---|---|
| १. | प्रश्नावली छपाई/मुलाखत रेकॉर्डींग इ. | रु २००००/- |
| २. | टपाल खर्च | रु २०००/- |
| ३. | प्रवास व दैनिक खर्च (संशोधक/प्रतिनिधी) | रु ३६०००/- |
| ४. | स्टेशनरी, मुद्रण, अहवाल व आचार संहिता पुस्तिका टंकलेखन, मुद्रित शोधन आणि छपाईखर्च | रु २५०००/- |
| ५. | किरकोळ खर्च | रु ५०००/- |
| | **एकूण** | **रु ८८०००/-** |

प्रस्ताव मान्यतेस साविनय सादर . आदर व आभारासह.

मान्यता असल्यास सदरचा खर्च DEB Research and Development या लेखाशिर्षाखाली करण्यात येईल. यासाठी २५०००००/- इतकी तरतुद करण्यात आली आहे.

(स्वाक्षरी) १६।०१।२०१४

प्रा. विजयकुमार पाईकराव
(शिक्षणशास्त्र विद्याशाखा)

मार्फत, (स्वाक्षरी) 16/1/2016
मा. डॉ. संजीवनी महाले
प्र· संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

6382
20/01/2015

मा.डॉ. सुनंदा मारे – २५ मार्च २०१५ पर्यंत या संशोधन प्रकल्पाचे काम व देयके दिल्या
नियोजन अधिकारी, ~~पूर्ण~~ जातील हे बघून कामाचे नियोजन करावे. DEB च्या 2014-15 साठी Research & Dev. या लेखाशिर्षामध्ये उपलब्ध असलेल्या २५ लाख अनुदानातून वरील खर्चास मान्यता देण्यास हरकत नाही. मान्यतेसाठी सादर . . .

(स्वाक्षरी) 19/01/2015

**मा. वित्त अधिकारी :**

पाईकराव सर [illegible] कुलगुरुंशी चर्चा करावी
8pm

मान्य करावे (स्वाक्षरी)

## Minor Research Project
## Proposal 2014 – 15

१. **संशोधनाचे शीर्षक :-**

''शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील अभ्यासकेंद्रांच्या समस्यांचा शोध घेऊन व्यवहार्य कार्यानंदासाठी आचारसंहितेची पुस्तिका विकसित करणे.

२. **प्रास्ताविकः-**

अभ्यासकेन्द्र हा मुक्त विद्यापीठ व अध्ययनार्थी ह्यांच्या मधिल महत्वपूर्ण दुव्वा होय. अध्ययनार्थी केन्द्रबिंदू मानून त्यांच्या ज्ञानलालसेस प्रोत्साहन देऊन निकोप पारदर्शी ज्ञानात्मक शैक्षणिक सुविधा व वातावरण उपलब्ध करुन देण्याचा महत्वपूर्ण कार्यानंद विद्यापीठाची अभ्यासकेन्द्र अविरतपणे करत आहेत. मुक्त व दूरशिक्षणाचा गुणात्मक दर्जा व शिस्त टिकविण्यासाठी, अनिष्ठ प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना तयार करण्यासाठी, त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. ह्या समस्या सोडविण्यासाठी अभ्यासकेन्द्राचे संचालक, केन्द्रसमन्वयक, संमंत्रक, केन्द्रसाहाय्यक, अध्ययनार्थी, पालक, संस्थाचालक, शासकीय यंत्रणा, हितचिंतक सदैव वेगवेगळ्या क्लुप्त्या, कल्पना, नीती वापरतात. त्यामुळे तेवढ्या प्रमाणात त्यांची समस्या सुटते. मात्र ह्याचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास व संकलन कमी प्रमाणात झालेले आहे. त्याचा एकत्रित आभ्यास केल्यास इतर नवीन केन्द्राला दिशादर्शी होईल. तसेच अभ्यासकेन्द्रावरील १)शैक्षणिक समस्या कोणत्या, २)प्रशासकीय व व्यवस्थापकीय समस्या कोणत्या, ३)आर्थिक समस्या कोणत्या, ४)मानवी व भौतिक प्रबोधनाच्या समस्या कोणत्या, ५)सामाजिक व शासकीय पातळीवरील समस्या कोणत्या आहेत. याची खऱ्या अर्थांनी मांडणी करुन त्या कमी करण्यासाठी मार्गदर्शक आचारसंहिता पुस्तिका विकसित करण्यात सुलभता व सोपेपणा येईल. यामुळे खोडसाळपणा करणाऱ्यांना चोक समसूचक असा प्रतिबंध बसेल अभ्यासकेन्द्रावर सेवाभावी वृत्तीने कार्यानंद करणाऱ्या तज्ज्ञांच्या मनावरील ताण तनाव कमी होईल. अभ्यासकेन्द्र व संमंत्रकांना संपर्कसत्रात प्रत्यक्षभेटून किंवा संपर्क मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे कार्य संस्कृतीची (Work-Culure) वाढ करण्यासाठी या पुस्तिकेची जाणिवपूर्वक निर्मीती केली जाईल. खरे तर या समस्येत, पेचप्रसंगात एक प्रकारची संधीही दडली आहे. तिचा उपयोग आमच्या अभ्यासकेन्द्रांनी करुन घेतला पाहिजे. सखोल अभ्यास व गत पंधरावर्षातील संशोधकाची चिंतनाची जोड देण्याचा प्रयत्न या प्रकल्पातून साध्य केला जाईल असा विश्वास वाटतो.

अभ्यासकेन्द्राकडे आता गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. अभ्यासकेन्द्रात अनास्था निर्माण होवून तुच्छता व नैराश्यवादाने त्याला वेढा घातला जात आहे. या परिस्थितीला अनेक घटक जबाबदार आहेत. पण इतरांकडे बोट दाखविल्यामुळे जबाबदारीतून आपली मुक्तता होणार नाही. म्हणून हा प्रकल्प.व आचारसंहिता पुस्तिकेत अभ्यासकेन्द्र संस्थाचालक/ विश्वस्त, केन्द्रसंचालक, समन्वयक,

अध्ययनार्थी, केन्द्रसाहाय्यक, पालक, समाज इ. साठी वर्तन, शिस्त व मार्गदर्शक स्वरुपातील नियम, गैरवर्तनासाठी दंडात्मक कार्यवाही आणि प्रबोधनपर उपक्रमांचा अंतर्भावसुध्दा असेल.

**३. संशोधन प्रकल्पाची उद्दिष्टे:-**

३.१ शिक्षणक्रम निहाय अभ्यासकेन्द्र समस्यांचा शोध घेऊन व संकलित यादी तयार करणे.

३.२ शिक्षणक्रम निहाय समस्या सोडविण्यासाठी वापरात येणाऱ्या उपाय योजनांची शोध घेऊन संकलन करणे.

३.३ आभ्यासकेन्द्रावरील व्यवहार्य कार्यानंदासाठी आदर्श आचारसंहिता पुस्तिका विकसित करणे.

**४. संशोधनाची कार्यपध्दती:-**

शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील गतवर्षी व शैक्षणिक वर्षे २०१४-१५ मध्ये सुरु आसलेल्या व अध्ययनार्थीनी प्रवेश घेतलेल्या सर्व शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेन्द्राला कोणकोणत्या समस्या येतात. ही पाहणी करण्यासाठी उद्दिष्ट निहाय सविस्तर प्रश्नावलीचे विकसन करुन ती प्रश्नावली पोस्ट, ई मेल व प्रत्यक्ष स्वरुपात माहिती संकलित केली जाईल. या समस्या कशा सोडवल्या या करिता कोणते व्यवहार्य उपाय योजना केली ह्या करिता जिल्हानिहाय किमान एका अभ्यासकेन्द्रावर जाऊन तेथील आजी व माजी केन्द्राचे विश्वस्त, संस्थाचालक, केन्द्रसंचालक, समन्वयक, संमंत्रक, सहाय्यक, पालक व हितचिंतक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती द्वारे माहिती संकलित केली जाईल.

समस्यांचे व उपाययोजनांचे अर्थ निर्वचन केल्या नंतर व्यवहार्य आचार संहितेची पुस्तिका विकसित करण्यात येईल.

**५. अपेक्षित खर्च:-**

| | | |
|---|---|---|
| ५.१ | प्रश्नावली छपाई/मुलाखत रेकॉर्डींग इ. | रु २००००/- |
| ५.२ | टपाल खर्च | रु २०००/- |
| ५.३ | प्रवास व दैनिक खर्च (संशोधक/प्रतिनिधी) | रु ३६०००/- |
| ५.४ | स्टेशनरी, मुद्रण, अहवाल व आचार संहिता पुस्तिका टंकलेखन, मुद्रित शोधन आणि छपाईखर्च | रु २५०००/- |
| ५.५ | किरकोळ खर्च | रु ५०००/- |
| | **एकूण** | **रु ८८०००/-** |

**६. साधने, सुविधा, उपकरणी, विशेष साधने:-**

६.१ संगणक, प्रिंटर, फॅक्स, फोन, भ्रमणध्वनी इ.

६.२ टंकलेखक कम कनिष्ठ साहाय्यक एक.

**७. शैक्षणिक व सामाजिक उपयुक्तता:-**

७.१ अभ्यासकेन्द्र हा गुणवत्तापूर्ण मुक्त शिक्षणप्रणालीचा कणा असल्यामुळे त्यांच्या आणि आदर्श आचार संहिता पुस्तिका तयार केल्यामुळे मानवी व भौतिक सुविधांचा सुयोग्य पारदर्शी होऊन ज्ञानार्जनाची प्रक्रिया सुलभ होईल. आचारसंहिता सारखे डाकुमेंट दिशा दर्शनासाठी